# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१

ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/क वर्ग/निनिअ/आदेश/ /सन २०१४/१००६ दि. ८ /१२/२०१४

**वाचावे** :- १) जा.क्र.रासनिप्रा/जिल्हासनिअआदेश/५४९/सन २०१४ दिनांक १०/१०/२०१४
२) जा.क्र.रासनिप्रा/तालुका-प्रभागसनिअआदेश/५५०/सन २०१४ दिनांक १०/१०/२०१४

**प्रस्तावना :-**

ज्याअर्थी, उपरोक्त वाचावे क्र. १ नुसार जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी नियुक्तीचे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. तसेच उपरोक्त वाचावे क्र. 2 नूसार तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांचेही नियुक्तीचे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. सदरचे आदेश हे महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) सन २०१४ नियम २ (8) व नियम २ (20) नुसार प्राधिकरणास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार निर्गमित करण्यात आलेले आहेत, आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ नूसार निवडणुकीस पात्र सहकारी संस्थांची निवणुक प्रक्रिया नियम ४ मध्ये नमूद केल्यानूसार अ, ब, क व ड प्रकारनिहाय पुर्ण करावयाची आहे, आणि,

ज्याअर्थी, वरील नियमातील नियम ४ (III) (IV) मध्ये नमूद केल्यानूसार क वर्ग व ड वर्ग प्रकारातील संस्थांची निवडणुक प्रक्रिया ही अनुक्रमे नियम ७५ व ७६ नूसार पुर्ण करावयाची आहे. तसेच नियम ७५ (2) (B) मधील तरतूदी नूसार क वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुका या तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांनी पार पाडणेबाबत स्पष्ट तरतूद करणेत आलेली आहे, आणि,

ज्याअर्थी, क वर्गातील राज्य/विभाग/जिल्हा/कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी संस्थांची निवडणुक पार पाडणेबाबत जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचेमध्ये संदिग्धता आहे,

त्याअर्थी, क वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया पार पाडणेसाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## आदेश

सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवणुक) २०१४ मधील नियम ७५ (2) (ब) मध्ये तरतूद केलेनूसार सर्व तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांनी, त्यांच्या वैधानिक अधिकार क्षेत्रासह महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) २०१४ मधील नियम ४ (III) मध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या अशा सर्व सहकारी संस्था की, ज्यांचे मुख्यालय, त्यांचे कार्यक्षेत्रात आहे, अशा राज्य/विभाग/जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या सर्व सहकारी संस्थांची निवडणुक प्रक्रिया पार पाडावयाची आहे.

**मा.आयुक्त राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, म.रा.पुणे यांचे आदेशानूसार**

8/12/14

**(डॉ.आनंद जोगदंड)**
**सचिव**
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,
१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी सर्व

2. तालुका /प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)

प्रत माहितीस्तव
१. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)

प्रत माहितीस्तव सस्नेह रवाना
1. मा.सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म.रा.पुणे.
३. मा. आयुक्त (साखर) साखर संचालनालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
४. मा. आयुक्त (दुग्धविकास) अब्दूल गफार खान मार्ग, वरळी सी-फेस, मुंबई १८
५. मा. संचालक, हातमाग, यंत्रामाग व वस्त्रोद्योग, नागपूर.